# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/07/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. रामटेक :-** दिनांक ०५/०७/२०२३ चे १५.०० वा. ते दिनांक १०/०७/२०२३ चे २०.०० वा. चे सुमारास पो.स्टे. रामटेक हद्दीत फिर्यादी हे कामावरून घरी आले असता फिर्यादीची मुलगी ही घरी न दिल्याने फिर्यादीने त्याच्या पत्नीला विचारणा केली असता तिने सांगीतले चुलत भासा याने सांगीतले की आम्ही दोघेही मनसरला जावुन परत येतो असे सांगीतले व घरून निघाले परत घरी न आल्याने फिर्यादी हे भासा याचे मोबाईलवर ०३ ते ०४ वेळा कॉल केला असता फोन बंद केला आहे म्हणुन फिर्यादीने त्याचे गावी व नातेवाईकांकडे आजपावतो शोध घेतला असता ते मिळुन आली नाही म्हणुन फिर्यादीने भासा पिन्टु कोचे याने फिर्यादीची मुलगी वय १७ वर्ष हिला फुस लावून पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अमित कुमार पांण्डेय मो. नं. ९८८१६८३१८४ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. उमरेड :-** अंतर्गत मौजा रिलायंस मॉल कावळापेठ येथे दिनांक ०९/०७/२०२३ चे १८.२० वा. ते १८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे- रज्जु चंद्रशेखर भोयर, वय २३ वर्ष, रा. महालगाव ता. भिवापुर हि रिलायंस मॉलमध्ये कॅश काउंटर क्र. १०३ वर डयुटीवर हजर असतांना एक अनोळखी इसम ज्याचे डोक्यावर टोपी अंगात काळया रंगाचा टि शर्ट घातलेला इसम फिर्यादीचे काउंटर जवळ आला त्याचे जवळ असलेले ५००/- रू ची जुनी नोट आहे बदलुन पाहिजे असे म्हणाला त्या आधी काउंटर मध्ये ३४२२६/- रू होते त्या मधुन एक ५००/- रू ची नोट देण्या करीता पैसे काढले त्या अनोळखी इसमाने मला ही नाही ती नोट पाहिजे असे म्हणुन फिर्यादीचे हातातले पैसे स्वत:च्या हातात घेतले. फिर्यादीला संशय आल्याने फिर्यादीने बाजुच्या काउंटर असलेले शुभम मेश्राम यांना बोलाविले त्यांनी त्या इसमाजवळुन पैसे परत घेतले. त्याला ५०० नोट परत दिले त्यानंतर तो मॉल मधुन निघुन गेला फिर्यादीची डयुटी संपल्याने कॅश जमा करीता ऑफिस मध्ये गेली असता फिर्यादी जवळ असलेल्या एकुण ३४२२६/- रू. मधुन अनोळखी इसमाने हातचलाखी करून व फिर्यादीची नजर चुकीने त्या रकमेमधुन १४५००/- रू. घेवुन जावुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रामेश्वर रावते मो. नं. ९५११७६४८८३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**